महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १३ वे ■ अंक क्र. – ५२ ■ सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

✻ उत्सुकता ✻




# सप्तशृंगी देवीच्या मंदिरावर नवा दिव्य कळस; वैदिक मंत्रघोषात ऐतिहासिक कलशारोहण सोहळा संपन्न

## हजारो भाविकांच्या साक्षीने सुवर्णक्षणाचा उत्सव; परंपरा, श्रद्धा, शिल्पकला आणि भव्य पुष्पसजावटीचा अनोखा संगम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कळवण प्रतिनिधी – दिपक बागुल – सह्याद्रीच्या सप्तशिखरांमध्ये विराजमान असलेल्या महाराष्ट्राच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी आद्य स्वयंभू शक्तीपीठ असलेल्या श्री सप्तशृंगी देवी मंदिराच्या नव्या कळसाचे ऐतिहासिक कलशारोहण आज (रविवार) श्रावण कृष्ण द्वितीया, आदित्य पूजन मुहूर्तावर वैदिक मंत्रोच्चारात, यज्ञ-हवन आणि हजारो भाविकांच्या साक्षीने अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या ऐतिहासिक सोहळ्याने श्रीक्षेत्र सप्तशृंगगडाच्या धार्मिक इतिहासात आणखी एका सुवर्ण अध्यायाची नोंद झाली.



श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या पुढाकारातून मंदिरावर नवीन कळस बसविण्याचा संकल्प करण्यात आला होता. या पवित्र कार्यासाठी राज्यासह देशभरातील असंख्य भाविकांनी वस्तूरूपाने तसेच देणगीच्या स्वरूपात उत्स्फूर्त योगदान देत धार्मिक सेवेला हातभार लावला. भाविकांच्या श्रद्धा आणि सहकार्यामुळे हा ऐतिहासिक उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला.

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टचे अध्यक्ष तथा धर्मदाय सहआयुक्त (नाशिक विभाग) मा. विवेक सोनुने यांच्या शुभहस्ते श्री सप्तशृंगी देवी मंदिराच्या कळसाचे पूजन व कलशारोहण करण्यात आले. प. पू. महामंडलेश्वर स्वामी श्री संविदानंद सरस्वती महाराज (कैलास मठ, नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली वैदिक विधीनुसार कळस स्थापना विधी संपन्न झाला.

नाशिकजवळील अंजनेरी येथील मूर्तिकार सुयोग मैंद यांनी पंचधातूपासून साकारलेला सुमारे ४८० किलो वजनाचा व सव्वासात फूट उंचीचा भव्य कळस या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरला. पारंपरिक शिल्पकलेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत तयार करण्यात आलेला हा कळस १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सप्तशृंगगडावर आणण्यात आला होता. गडावर आगमनानंतर त्याची नगरप्रदक्षिणा काढण्यात आली होती.

नवीन कळस सात टप्प्यांत विभागलेला असून तो सप्तचक्रांचे प्रतीक मानला जातो. कळसाच्या पायथ्याशी केलेले पुष्पाकृती कोरीव नक्षीकाम, सूक्ष्म कलाकुसर आणि पारंपरिक रचना यामुळे त्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. धार्मिक परंपरा, भारतीय स्थापत्यकला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उत्कृष्ट संगम या कळसातून साकार झाला आहे.

सन १९९२-९३ मध्ये शिल्पकार शरद मैंद यांनी घडविलेल्या जुन्या कळसाचा समावेश नव्या कळसात करण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वीच्या परंपरेचा मान राखत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात आला असून, श्रद्धा आणि वारसा यांचा सुंदर मिलाफ या ऐतिहासिक कार्यातून घडून आला आहे.

कलशारोहण सोहळ्यानिमित्त श्री सप्तशृंगी देवी मंदिर, मंदिराचा कळस परिसर, सभामंडप, यज्ञ-हवन मंडप तसेच श्री भगवतीच्या मुख्य गाभाऱ्यापासून संपूर्ण परिसर विविधरंगी ताज्या फुलांच्या आकर्षक सजावटीने नटविण्यात आला होता. मंदिर परिसरातील प्रत्येक भाग फुलांच्या देखण्या आरासीत उजळून निघाल्याने भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. या भव्य पुष्पसजावटीचे नियोजन प्रवीण टिडणे यांनी केले असून, शंकरराव जुन्नरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत आकर्षक व कलात्मक आरास साकारली.

(पान २ वर)

इतिहास

घडत नाही घडवतात...
आणि तो घडविण्यासाठी
आम्ही सज्ज आहोत
फक्त तुमची साथ हवी!!

दहेगाव, तांदुळवाडी, पोखरी, माणिकपुंज,
गणेशनगर, जळगाव(खु),
जळगाव(बु), चिंचविहिर, डॉक्टरवाडी,
बाभुळवाडी, पिंपरखेड, परधडी,
न्यायडोंगरी, पिंपरी हवेली, हिंगणे, देहरे,
सावरगाव, पळाशी, रणखेडा,
बिरोळा, चांदोरा, पोखरी, तांदुळवाडी,

मिशन न्यायडोंगरी गट -४१



अॅड.भगवान (माऊली) सोनवणे
संस्थापक – दैनिक आवाज
संस्थापक – नवक्रांती युवक संघ
मो- ९५४५९१०१७७




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून
B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.
प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻
✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
✻ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799






## येवला तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सवात जनता विद्यालय मुखेड तृतीय



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत मुखेड येथील जनता विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. तर अखिल भारतीय विज्ञान मेळावा मध्ये आराध्या आहेर हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. येवला तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धा एन्झोकेम हायस्कूल मध्ये झाल्या, त्यात तालुक्यातील ९ शाळांनी भाग घेतला. या स्पर्धेत 'मविप्र'च्या मुखेड येथील जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'इलेक्ट्रिक वाहने: पुढचा मार्ग' या विषयावर नाटिका सादर केली. आराध्या आहेर, तनिष्का बडवर, हर्षाली शेळके, दिक्षा जुगुत, प्रसाद आव्हाड, रुद्र कुंभकर्ण, मयूर शेळके, ओम आहेर आदी विद्यार्थी सहभागी होते. नाटिकेचे लेखन ज्येष्ठ शिक्षक दिलीप खताळ यांनी केले तर वर्षा बडवर, सागर घोटेकर व श्याम शिंदे यांनी मार्गदर्शक केले.मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विश्वासराव आहेर, उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष कृष्णराव गुंड , मुख्याध्यापक महेंद्र भगत, पर्यवेक्षक संजय गोसावी, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले.

## पिनाकेश्वर देवस्थानी पोलिस प्रशासन व वनविभाग सज्ज

**दै. आवाज वृत्तसेवा...**

ईश्वर जाधव जातेगांव :

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या डोंगरावरील पिनाकेश्वर देवस्थानी जलाभिषेकासाठी तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त लाखो भाविक दाखल होणार आहेत त्या निमित्त पोलिस प्रशासन व वन विभाग सज्ज झाले आहे.



पिनाकेश्वर महादेव हे नांदगाव तालुक्यातील जातेगांवच्या सातमाळा डोंगररांगेतील पूरातन देवस्थान असून मोठा महादेव या नावानेही ते ओळखले जाते. राष्ट्रसंत सदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरी यांनी मंदिराचे जिर्णोद्धार कार्य साठच्या दशकात केले होते. भाविकांच्या मते नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर नंतर दुसऱ्या क्रमांकाचे हे प्रमुख देवस्थान समजले जाते. यंदा श्रावणमासातील तिसऱ्या सोमवारी यात्रेकरू व कावडधारी भाविकांच्या वाढलेल्या गर्दीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून मोठी तयारी करण्यात आली आहे.पोलिस निरीक्षक यशवंत सोळंसे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ पोलिस अधिकारी, ३० पोलिस अंमलदार,राखीव पोलिस बलाच्या २ तुकड्या तर ३७ होमगार्ड व परिसरातील प्रत्येक गावातील पोलिस पाटील व पोलिस मित्र तैनात असणार आहे.एवढ्या संख्येने बंदोबस्त करून पोलिस प्रशासन भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन सज्ज झाले असून वाढणाऱ्या गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून विशेष मोहीम राबविणार आहे. पिनाकेश्वर देवस्थान वनविभागात असल्याने तिसऱ्या सोमवार निमित्त पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन वनविभागाही देखरेखीसाठी सज्ज असणार असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी हेमंत कोकाटे यांनी सांगितले आहे.

यंदा दोन ते अडीच लाख भाविकांची शक्यता : येथील शिवजलाभिषेकाची अखंड परंपरा कायम असून दरवर्षी श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी लाखो भाविक विविध नद्यांचे व जलाशयांचे पाणी कावडीने पायी चालत आणून शिवजलाभिषेक करतात. शिवदर्शन व जलाभिषेकासाठी अंदाजे दोन ते अडीच लाख भाविक दाखल होणार असल्याचे विश्वस्तांनी सांगितले आहे. यंदा परिसरात पावसाची अवकृपा असल्याने पायी येणाऱ्या कावडधारी यात्रेकरुंपेक्षा वाहनाने अधिक कावडधारी यात्रेकरू येणार असल्याचे सांगितले जाते.

## राजापूरसह परिसरात व तालुक्यात पावसाने दडी मारल्याने पिके धोक्यात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - येवला तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या राजापूर सह परिसरात गेल्या एक महिन्याभरापासून पावसाने उघडी दिल्याने पिकांची मोठ्या प्रमाणात पिके सुकून जात आहेत येवला तालुक्यातील पूर्व भाग निसर्गाच्या भरवशावर शेती केली जाते या भागात कुठल्याही सिंचनाची सुविधा उपलब्ध नाहीत या भागात असलेल्या राजापूर सह परिसरात खरिपाच्या पेरण्या झाल्यानंतर रिमझिम पाऊसामुळे कसेबसे पीके मोठी दिसायला लागली परतु आता पावसाने दडी मारल्यानंतर पिकाना आता सध्या पिकांना पाण्याची गरज असून पिके पाण्यावाचून शुकुनचालली आहेत निसर्गाचे ह्या लहरीपणामुळे शेतकरी वर्ग हातबल झाले आहे खरिपांच्या पेरणी झाल्यानंतर रिमझिम पावसावर पेरण्या झालयावर थोडेफार पीक मोठ्या झाले परंतु मुगाला शेंगा लागायची वेळ आली व पाऊस नाही बाजरीला फुलारा लागण्याची वेळ पाऊस नाही. मकाला बिटी लागण्याची वेळ पाऊस नाही, असी बिकट परिस्थिती निर्माण झाली असल्याने शेतकऱ्यांनी केलेला खर्च सुद्धा फिटणार नाही. अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली असल्याने दुष्काळी परिस्थिती उद्भवली जाणयाची शक्यता आहेत त्यामुळे शेतकरी पुन्हा आणखीन कर्जाच्या घाईत जाणार आहेत. पावसाने ओढ दिल्यामुळे खरिपातील मका बाजरी, सोयाबीन,भुईमूग तूर,मुग, हे पिके संकटात सापडले आहेत व विहिरींना पाणी नसल्याने पाणी सुद्धा देणे शक्य होत नाही अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे शेतकरी वर्ग पावसाची आतुरतेने वाट पाहत असून खरिपातील पिके याच्या नंतर पाऊस होऊनही तयाचा उपयोग होईल अस असे वाटत नाही व पुढे पाऊस झाला तर रब्बी हंगामाची शेतकऱ्यांना आशा आहेत आता पाऊस झाल्यास रब्बीची पिके घेता येईल या आशावादावर शेतकरी सध्या तग धरून पाऊसाची वाट पाहत आहेत.




## सप्तशृंगी देवीच्या मंदिरावर नवा दिव्य कळस...

(पान १ वरून) संपूर्ण मंदिर परिसर भक्ती, सौंदर्य आणि दिव्यतेचा अद्वितीय संगम अनुभवत होता.

या ऐतिहासिक सोहळ्यास ट्रस्टचे मा. श्री. विवेक सोनुने, अध्यक्ष, श्री. सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड तथा धर्मदाय सह आयुक्त, नाशिक - १, मा. तहसीलदार तथा विश्वस्त, प. पूज्य महामंडलेश्वर स्वामी श्री संविदानंद सरस्वती महाराज, कैलास मठ (नाशिक), प्रणिता श्रीनिवार धर्मादाय उपआयुक्त नाशिक, विशाल जाधव अधिक्षक नाशिक, प. पूज्य महंत विष्णूदासजी महाराज,ड अनमित्र मुजुमदार, ॲड.हर्ष महाले, ॲड. भाऊसाहेब गंभीरे, ॲड.पराग जाधव, ड. कदम, संजय जाधव, मा. श्री. संदीप कर्णिक - पोलीस आयुक्त, नाशिक शहर, मा. श्री रोहिदास ठोंबरे, सहा पोलीस निरीक्षक, कळवण, मा. सरपंच श्री. रमेश पवार, मा. उपसरपंच श्री. संदीप बेनके मा. उपसरपंच श्री. राजेश गवळी, मा. श्री. शांताराम गवळी, मा. श्री. गणेश बर्डे, मा. श्री. अजय दुबे - अध्यक्ष,व्यापारी संघटना, मा. श्री. अशोक खांडेकर, मा. श्री. वसंत साळुंखे, माजी अध्यक्ष श्री एस. एम. शेंबोले, श्री. सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड, माजी विश्वस्त ॲड. श्री. भास्करराव पवार माजी विश्वस्त ॲड. श्री. विजय देशमाने, माजी विश्वस्त ॲड. श्री. ललित निकम, माजी विश्वस्त डॉ. श्री. प्रशांत देवरे, माजी विश्वस्त सौ. मनज्योत पाटील, मा. श्री. दिलीप देशमुख, निवृत्त जिल्हा व अति सत्र न्यायाधीश, ॲड. श्री. राहुल खुटाडे, नाशिक, मा. डॉ. राजेंद्र सुरेश वराडे, दिंडोरी, मा. श्री. विष्णू त्र्यंबक वारुंगसे, नाशिक, वास्तुविशारद श्री जयंतराव देशमुख स्ट्रक्चरल कॅन्सल्टंट श्री. जगदीश देशमुख, वास्तुविशारद श्री गौरव देशमुख, वास्तुविशारद श्री. अमोल सावकार, ठेकेदार श्री. राजेश लोथे (मे. एल पी कन्स्ट्रक्शन, नाशिक), व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुदर्शन दहातोंडे, प्र. अधीक्षक तथा इस्टेट कस्टोडियन श्री. प्रकाश पगार, जनसंपर्क अधिकारी श्री. भिकन वाबळे, प्र. लेखा विभाग प्रमुख श्री. शाम पवार, मंदिर सहा प्रमुख श्री. विश्वनाथ बर्डे, मंदिर पर्यवेक्षक श्री. सुनिल कासार, बांधकाम पर्यवेक्षक श्री. सागर निश्चित, प्रसादलाय विभाग प्रमुख श्री. नारद आहिरे, उपकार्यालय सहा विभाग प्रमुख श्री. विजय भवरे, सुरक्षा विभाग प्रमुख श्री. यशवंत देशमुख, वाहन पर्यवेक्षक श्री. संतोष चव्हाण, भक्तनिवास पर्यवेक्षक श्री. प्रशांत निकम, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. रणजित उगले, पुरोहित संघ अध्यक्ष श्री. धनंजय दीक्षित, श्री. शांताराम भानोसे, नाशिक, श्री. घनशाम दीक्षित, श्री. श्रीकांत दीक्षित, श्री. सुनिल दीक्षित, श्री. शेखर देशमुख, श्री. भाग्येश दीक्षित, श्री. गौरव देशमुख, श्री. मिलिंद दीक्षित, श्री. प्रसाद दीक्षित, श्री. चैतन्य दीक्षित,पं श्री शांताराम मोहिनीराज भानसे, पं. श्री विक्रम चिंतामणी आंबेकर, पं श्री प्रविण प्रकाश जोशी, पं श्री दिपक हरेश्वर शौचे, पं श्री हरिष जोशी, पं श्री रोहन बैरागी, पं श्री यज्ञेश मिलिंद खांदवे, पं श्री श्रिरंग सदाशिव जोशी कर्मचार, पुरोहित तसेच हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कलशारोहणानंतर संपूर्ण मंदिर परिसर 'सप्तशृंगी माते की जय, बोल अंबे की जय,' च्या जयघोषाने दुमदुमून गेला. वैदिक मंत्रोच्चार, पारंपरिक वाद्यांचा निनाद, यज्ञ-हवनाची पवित्रता आणि फुलांच्या मोहक सजावटीमुळे श्रीक्षेत्र सप्तशृंगगड आज एका अविस्मरणीय आणि ऐतिहासिक धार्मिक सोहळ्याचा साक्षीदार ठरला.

## राजापूर येथील भैरवनाथवाडी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - येवला तालुक्यातील राजापूर येथील भैरवनाथ वाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहची सांगता झाली. श्रावण महिन्यातील नागपंचमी पासून सुरू झालेला सप्ताह दिनांक २५ ऑगस्ट रोजी ह भ प बालाजी महाराज मोहिते यांच्या काल्याचे किर्तन होऊन आणि सप्ताहाची सांगता झाली आठ दिवस काकडा भजन प्रवचन कीर्तन दररोज महाप्रसाद असे आयोजन सप्ताह कमिटी व राजापूर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. यामध्ये विशेष आकर्षण म्हणजे दिनांक २३ रोजी सध्याकाळी असलेली पगत सोन्याबापु वाघ व अशोक महादू वाघ यांनी आलेल्या सर्वांना कुळदापासून बनवलेली जिलेबी व बाजरीची भाकर असा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याने सप्ताह मध्ये हे एक आगळे वेगळे आकर्षण ठरले या सप्ताह साठी कुणाल दराडेफाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कुणाल दराडे माजी आमदार नरेंद्र दराडेयांचीही उपस्थिती होती. दहीहंडी फोडून काल्याचे किर्तन होऊन आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप होऊन सप्ताहाची सांगता झाली या सप्ताहाकाळात भैरवनाथवाडी मित्र मंडळ व राजापूर ग्रामस्थांनी विशेष असे परिश्रम घेतले व सप्ताहाची सांगता झाली. आठ दिवस सप्ताकाळात सकाळ व संध्याकाळची पंगत देणाऱ्यांचा सत्कार भैरवनाथ वाडी सप्ताह कमिटीच्या वतीने कमिटीच्या वतीने करण्यात आला. व सप्ताहाची सांगता झाली

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# केरसाणे-दसाणे ग्रामपंचायतीचा माणुसकीचा धागा; एकल व दिव्यांग महिलांना रक्षाबंधनाची अनोखी भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सटाणा प्रतिनिधी : भगवान पवार

सटाणा : बागलाण तालुक्यातील केरसाणे-दसाणे ग्रुप ग्रामपंचायतीने रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत सामाजिक बांधिलकी जपत एक अभिनव उपक्रम राबविला. गावातील एकल महिला तसेच दिव्यांग महिलांना साडी व साखरेचे वाटप करून ग्रामपंचायतीने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला.

रक्षाबंधन हा बहीण-भावाच्या प्रेमाचा आणि आपुलकीचा सण. मात्र, काही महिलांना परिस्थितीमुळे हा सण अपेक्षित आनंदाने साजरा करता येत नाही. अशा महिलांना सणाच्या आनंदात सहभागी करून घेत त्यांना एकटेपणाची जाणीव होऊ नये, या सामाजिक भावनेतून ग्रामपंचायतीने हा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमांतर्गत तीन दिव्यांग महिला आणि नऊ एकल महिलांना साड्या व साखरेचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे संबंधित




महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे बागलाण तालुक्यात कौतुक होत आहे. यावेळी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच फुलाबाई माळीस, उपसरपंच संजय आहिरे, ॲड. योगेश मोरे, महेंद्र माळीस, संजय पवार, काळू माळीस, सविता जाधव, रंजना खैरनार, कोकिळा आहिरे, सुनीता माळीस, संगीता सोनवणे, ग्रामसेविका अश्विनी पवार तसेच ग्रामपंचायत कर्मचारी भाऊसाहेब खरे, शरद आहिरे, किरण पिंपळसे, अमोल सोनवणे आदी उपस्थित होते.

# आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## प्रा. डॉ. अरुण वामन आहेर यांचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

**दै.आवाज वृत्तसेवा...**

नायडोंगरी (प्रतिनिधी) - आईच्या स्मृती जपत तिच्या संस्कारांना सामाजिक कार्याची जोड देण्याचा प्रेरणादायी उपक्रम जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, नायडोंगरी येथे पार पडला. प्राध्यापक डॉक्टर श्री. अरुण वामन आहेर (हल्ली मुक्काम देऊळगाव राजा) यांनी आपल्या आई स्व. अंजनाबाई वामन आहेर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेतील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व शालेय उपयोगी साहित्याचे वाटप केले. आईची माया, संस्कार आणि आशीर्वाद ही प्रत्येकाच्या आयुष्यातील अमूल्य शिदोरी असते. आई आपल्या सोबत नसली, तरी तिच्या आठवणी आणि संस्कार आपल्या चांगल्या कृतीतून जिवंत ठेवता येतात. याच भावनेतून प्रा. डॉ. अरुण वामन आहेर यांनी आईच्या स्मृतींना केवळ श्रद्धांजली न वाहता, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे केला. शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद या उपक्रमाचे खरे समाधान ठरले. एका आईच्या पवित्र स्मृतींना अनेक विद्यार्थ्यांच्या



उज्ज्वल भवितव्याशी जोडण्याचे प्रेरणादायी कार्य या उपक्रमातून घडले. आईच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, शिक्षणाविषयीची आस्था आणि मातृऋणाची जाणीव यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. समाजातील इतरांनीही अशा उपक्रमांतून गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी करण्यात आलेला हा उपक्रम परिसरात कौतुकाचा आणि प्रेरणेचा विषय ठरला. तत्प्रसंगी विजय आहेर, साहेबराव आहेर, अशोक आहेर आदि उपस्थित होते.

# परधाडी विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**दै.आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव - छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालय, परधाडी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन व महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मेजर ध्यानचंद, सरस्वती माता व संस्थापक लोकनेते विजूमामा आहेर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी, खेळातून शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना, चिकाटी व नेतृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी इयत्ता दहावीचा विद्यार्थी प्रतीक बागुल याने राष्ट्रीय क्रीडा दिन व मेजर ध्यानचंद यांच्या कार्याविषयी भाषण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. क्रीडा शिक्षक श्री. बोरसे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळाचे जीवनातील महत्त्व विशद केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. पी. एन. सोनेज होते. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. सूत्रसंचालन एम. एन. पवार सर यांनी तर आभार प्रदर्शन भोसले सर यांनी केले.

दरम्यान, रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे व स्नेहाचे नाते अधिक दृढ केले. क्रीडा आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# पिंपळगाव लेप शाळेत रक्षाबंधन उपक्रम उत्साहात संपन्न साजरा

**दै.आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी -

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दप्तरमुक्त शनिवार उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक व सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.यावेळी विद्यार्थिनींनी स्वतःच्या कल्पकतेतून सुबक व आकर्षक राख्या तयार केल्या.राख्या तयार करण्याच्या माध्यमातून विद्यार्थिनींना व्यवसाय शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. टाकाऊ वस्तूंचा कल्पक वापर करून आकर्षक राख्या तयार करताना विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता,कौशल्य आणि स्वयंरोजगाराची प्राथमिक माहितीही आत्मसात केली.बहिण-भावाच्या प्रेमाचे व आपुलकीचे नाते अधिक दृढ करणारा रक्षाबंधन सण शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींनी शाळेतील विद्यार्थ्यांना प्रेमाने राख्या बांधून रक्षाबंधनाच्या




शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव,प्रेम,जिव्हाळा,परस्पर आदर व सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होण्यास मदत झाली.तसेच विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढविण्याच्या उद्देशाने 'मी ज्ञानी होणार' या चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

या चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा, आकलनाचा व विविध विषयांबाबतच्या माहितीचा आढावा घेण्यात आला.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत चाचणी सोडविली.या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक शिक्षिका तसेच विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे रक्षाबंधन व 'मी ज्ञानी होणार' चाचणी उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# अहिल्यानगर जिल्ह्याने मिळवला प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार

**दै.आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी भारत सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाद्वारे नवी दिल्ली येथील 'इंडिया हॅबिटॅट सेंटर' येथे दिनांक २४ आणि २५ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय 'झचत्रच्चए कॉन्क्लेव्ह'चे (परिषदेचे) भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्ह्याला प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत केंद्रस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयमार्फत पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार माननीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी स्वीकारला. या वेळी कृषी मंत्री मा. दत्तात्रय भरणे, मा. अविनाश जोशी, केंद्रीय सचिव, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, मा. देवेश देवाल, सहसचिव, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, कृषि संचालक विजयकुमार आवटे हे मान्यवर उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यात या योजनेअंतर्गत १८५५ अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात आले असून, अहिल्यानगर जिल्हा कृषी विभागाच्या ह्या अतुलनीय कामगीरी मुळे जिल्ह्याचा नावलौकिक राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे. पुरस्कारांच्या वर्गवारीत महाराष्ट्र राज्याचा देशात प्रथम क्रमांक येण्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी सरासरी प्रकल्प कर्ज ११.६८ लाख रुपये व सरासरी ४.२७ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्याच्या ह्या कामगीरी मुळे असंघटित क्षेत्रातील अन्न प्रक्रियादार हे संघटित क्षेत्रात आल्याने बँक कर्ज उपलब्ध होण्यास व शासकीय योजनांचा लाभ घेता आला आहे. अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीने रोजगारांची निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात ७९ कोटी रुपयांचे अनुदान अन्नप्रक्रिया उद्योगांना वितरित झाले असल्याचे प्रतिपादन सुधाकर बोराळे यांनी केले. तसेच, जिल्ह्यात जास्तीत जास्त उद्योजक तयार करून तरुणानासाठी रोजगाराच्या संधी जिल्ह्यातच उपलब्ध होत आहे असे त्यांनी नमूद केले.



पालकमंत्री मा ना. राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व बँका, कृषी विभागातील अधिकारी - कर्मचारी व जिल्हा संसाधन व्यक्तींनी संघभावनेने काम केले. परिणामी, अहिल्यानगर जिल्ह्याने केंद्र शासनाच्या स्तरावर पुरस्कार मिळवला. - सुधाकर बोराळे

# विंचूरला शिरसाट दाम्पत्याने स्वखर्चाने केली अंगणवाडी डिजिटल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**भाऊसाहेब हुजबंद, विंचूर :** येथील अंगणवाडी सेविका सोनाली शिरसाट यांनी पती विनोद शिरसाट यांच्या मदतीने स्वखर्चातून जीर्ण झालेल्या अंगणवाडीचे नूतनीकरण करून अंगणवाडी डिजिटल केली. मुलांच्या सुरक्षिततेसह आधुनिक व आनंददायी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देत या दाम्पत्याने समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. निफाड पंचायत समितीच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी कविता पाटील यांच्या हस्ते नूतनीकरण करण्यात आलेल्या अंगणवाडीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते, विंचूर ग्रामपालिकेचे प्रशासक सचिन दरेकर, पर्यवेक्षिका वंदना खांदवे, कैलास सोनवणे, गंगाधर गोरे, अविनाश दुसाने, विलास गोरे, निरज भट्टड हे होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला.



पर्यवेक्षिका वंदना खांदवे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी स. पो. नि. सागर कोते, कैलास सोनवणे, गंगाधर गोरे व किशोर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सोनाली शिरसाट या गेल्या १४ वर्षांपासून अंगणवाडी मदतनीस म्हणून कार्यरत होत्या. गेल्या जून महिन्यात त्यांना बढती मिळून अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्ती झाली. त्यांना जिल्हा परिषद शाळेजवळील अंगणवाडीची जबाबदारी मिळाली. सदर अंगणवाडी सन १ जून १९९० रोजी स्थापन झालेली ही विंचूरमधील सर्वात जुनी अंगणवाडी आहे. मात्र, या अंगणवाडीची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. मूलभूत सुविधांचा अभाव होता. तसेच अंगणवाडीच्या लगतच एक पुरातन सार्वजनिक विहीर असल्याने मुलांच्या शिक्षणासह सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता.ही परिस्थिती लक्षात घेऊन सोनाली शिरसाट व त्यांचे पती विनोद शिरसाट यांनी स्वखर्चातून अंगणवाडीचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला. नूतनीकरणामध्ये संरक्षक जाळी, प्लास्टर, फरशी, रंगकाम, फॅन, खेळाचे साहित्य आदी मूलभूत सुविधांसह एलसीडी स्क्रीनची व्यवस्था करून अंगणवाडी डिजिटल करण्यात आली आहे. शिरसाट दाम्पत्याच्या कार्याने प्रेरित होऊन कैलास सोनवणे यांनी एका अंगणवाडीचे नूतनीकरण करण्याची घोषणा केली. व स. पो. निरी. सागर कोते यांनी लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने एक अंगणवाडी डिजिटल करण्याचे जाहीर केले.तर ग्रामपंचायत अधिकारी रा. म. मगर यांनीही २१ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत करण्याचे जाहीर केले.याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात बाल विकास प्रकल्प अधिकारी कविता पाटील यांनी सोनाली व विनोद शिरसाट या दाम्पत्याच्या औदार्याचे कौतुक केले.तसेच बाल विकास प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देताना अंगणवाडीतील बालकांना शिक्षणा बरोबरच दर्जेदार नाश्ता व जेवण दिले जाते.मात्र अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी येणाऱ्या आहाराची तपासणी करून निकृष्ट दर्जाचा आहार स्वीकारू नये असे आवाहन केले.तसेच जुन्या अंगणवाड्या निर्लेखित करून शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यांच्या नूतनीकरणासाठी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन दिले. यावेळी विंचूर प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोर पाटील, पत्रकार संदीप शिरसाट, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील दरेकर, निलेश चव्हाण, ज्ञानेश्वर दरेकर, डॉ. शैलेश काळे, निलेश सालकाडे, राजेंद्र मोरे, इम्रान मोमीन, किरण शिरसाट, महेश शिरसाट, सुलतान पठाण, उत्तम शिरसाट, मनोज शिरसाट, सतीश सोनवणे, शरद गलांडे आदींसह विद्यार्थी, अंगणवाडी सेविका व मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी रा. म. मगर यांनी केले, तर विनोद शिरसाट यांनी आभार प्रदर्शन केले.

# तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत पालखेड विद्यालयाला उपविजेतेपदाचा बहुमान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड/प्रतिनिधी - तालुक्यातील भाऊसाहेबनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय १४ व १७ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड विद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार व उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयाच्या खेळाडूंनी स्पर्धेतील बलाढ्य संघांना पराभूत करत अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला आणि अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळ करत दोन्ही वयोगटांत द्वितीय क्रमांक मिळवून उपविजेतेपदाचा बहुमान पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**१४ वर्षे वयोगटातील खेळाडू–**

शुभम गांगुर्डे, दीपक वार्डे, प्रेम गांगुर्डे, कार्तिक कोकाटे, आरव दिवे, कार्तिक जाधव, दीपक गोरे, दर्शन गांगुर्डे, अर्जुन शिंदे, स्वराज कडाळे, आर्यन गांगुर्डे, साई डंबाळे, राजू शेख, साहिल बागुल, दर्शन बेंडकुळे, सरस दिवर.

**१७ वर्षे वयोगटातील खेळाडू–**

देवराम वार्डे, समीर कोकाटे, देवराम वराडे विवेक लहानगे समीर गांगुर्डे रोशन थेटे वानदेव प्रज्वल शिंदे आदेश गोरे चेतन कोकाटे अमर कोकाटे रोशन कोकाटे समीर वाजदेव, रिजवान शेख, गुलशन दिवर, रुद्र गांगुर्डे, रोहित गांगुर्डे, प्रणव सुरासे. सदर यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,कार्यकारी संचालक आदरणीय प्रा. दिपक जोंधळे, संस्थेचे कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय दिघे, अशोक शेळके, क्रीडा शिक्षक सावन जाधव, ज्ञानेश्वर मातेरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.खेळाडूंच्या जिद्द, चिकाटी, मेहनत आणि उत्कृष्ट सांघिक खेळामुळे मिळालेले हे यश कौतुकास्पद आहे.



# हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून साजरे केले रक्षाबंधन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड/प्रतिनिधी - रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा उत्सव न राहता निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा ठरावा, या उद्देशाने के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेब नगर येथील हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. प्रसंगी विद्याभवनाचे प्राचार्य दिवाकर शेजवळ प्रमुख अतिथी संजय खैरे उपमुख्याध्यापिका सुनीता वडघुले पर्यवेक्षक डि के मोरे, बाजीराव वाघ, शिवाजी जावळे, प्रकाश गोतरने, स्वप्नील जाधव हरित सेनाप्रमुख गोविंद कांदळकर, इको क्लब प्रमुख गायत्री रत्नपारखी, शितल साळी,अश्विनी जावळे, पूजा बोंबले, दिपाली पवार व शिक्षक शिक्षिका आदी उपस्थित होते. हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी विद्यालय परिसरातील विविध झाडांना आकर्षक राख्या बांधून झाडे वाचवा, पर्यावरण वाचवा असा संदेश दिला. झाडे आपल्याला प्राणवायू, सावली, फळे व पर्यावरणाचा समतोल देतात. त्यामुळे झाडांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून दिला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत झाडांना राखी बांधत त्यांच्या संवर्धनाचा संकल्प केला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे शिक्षक व उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. झाडे आहेत म्हणून जीवन आहे, झाडांचे रक्षण करणे हेच खरे रक्षाबंधन आहे! या संदेशाने परिसरात पर्यावरणपूरक रक्षाबंधनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

# पालखेडच्या विद्यार्थ्यांनी सीमेवरील जवानांसाठी पाठवल्या राख्या - न्यू इंग्लिश स्कूलचा स्तुत्य उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड /प्रतिनिधी - रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशरक्षणासाठी सीमेवर तैनात असणाऱ्या जवानांसाठी राख्या पाठवून एक अनोखा जिव्हाळा जपला आहे. आपल्या कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज आपण आपल्या घरात सुरक्षित आहोत, कारण देशाच्या सीमेवर आपले सैनिक ऊन, वारा, पाऊस आणि बर्फाच्छादित भागातही छातीचा कोट करून उभे आहेत. स्वतःचे प्राण धोक्यात घालून देशवासीयांचे रक्षण करणाऱ्या या शूर जवानांना 'आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत' हा विश्वास देणे आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आणि प्रेमाने निवडलेल्या या राख्या सैनिकांचे मनोधैर्य नक्कीच उंचावतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.मुख्याध्यापक संजय दिघे सर,अशोक शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहात पार पडला. विद्यालयाच्या वतीने उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी ,सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या प्रेरणेने सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे एकत्र येत या राख्यांचे संकलन केले आणि सैन्य दलात कार्यरत जवान शुभम जगताप यांचे वडील सयाजी विठोबा जगताप यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम आणि सामाजिक भान रुजविणाऱ्या या उपक्रमाचे पालखेड परिसरामध्ये अत्यंत कौतुक होत आहे.



